**जिल्हा परिषद वाशिम सरळसेवा भरती २०२३**

**लघुलेखक (उच्चश्रेणी) पदासाठी उमेदवारांची अंतीम निवड यादी**

जाहीरातीनुसार एकुण रिक्त पदे- खुला-१ पद

| अ.क्र. | बैठक क्रमांक | उमेदवारांचे नाव | प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| २ | ११४००००११९ | गणेश एकनाथ खटके | खुला | खुला | -- |

**लघुलेखक (उच्चश्रेणी) या पदासाठी उमेदवारांची अंतीम प्रतिक्षा यादी**

| अ.क्र. | बैठक क्रमांक | उमेदवारांचे नाव | प्रवर्ग | निवड यादीतील प्रतिक्षा क्रम |
|---|---|---|---|---|
| १ | ३४४००००५३ | रोहन गणेशराव पवार | खुला | खुला-१ |
| २ | २९४००००२८१ | गणेश साहेबराव पवार | खुला | खुला-२ |

लघुलेखक (उच्चश्रेणी) या संवर्गातील खुल्या प्रवर्गाचे १ पदाकरिता तात्पुरती अंतरीम निवड व तात्पुरती अंतरीम प्रतिक्षा यादी संबंधीत उमेदवारांचे कागदपत्र तपासणीचे अधिन राहून दिनांक १२/०३/२०२४ रोजी वाशिम जिल्हा परिषदेच्या www.zpwashim.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

दिनांक १२/०३/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या अंतरीम निवड यादीमधील निवड झालेले उमेदवार श्री.यश सुदेश आगरकर कागदपत्र तपासणीस गैरहजर राहीले असून त्यांनी सदर पदावर रूजू होण्यास इच्छूक नसल्याबाबत लेखी कळविले आहे. तसेच तात्पुरत्या अंतरीम प्रतिक्षा यादीतील अ.क्र.१ वरील उमेदवार श्री.कुलदीप बळीराम निकम हे सुध्दा कागदपत्र तपासणीस गैरहजर राहीले असून त्यांनी इतर ठिकाणी नोकरीवर असल्यामुळे सदर पदावर रूजू होऊ शकत नसल्याबाबत लेखी कळविले आहे. त्यामुळे कागदपत्र तपासणीस उपस्थित असलेले तात्पुरत्या अंतरीम प्रतिक्षा यादीतील अ.क्र.२ वरील उमेदवार श्री.गणेश एकनाथ खटके यांची उपरोक्त प्रमाणे लघुलेखक (उच्चश्रेणी) या पदावर अंतीम निवड करण्यात आलेली आहे.

जिल्हा परिषद वाशिमने प्रसिध्द केलेल्या जाहीरातीमधील मुद्दा क्र.१७.१६ मध्ये उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारले जाणार असल्याने स्पर्धा परिक्षेअंती गुणवत्तेनुसार प्रथम अंतरीम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल, तदनंतर अर्ज सादर करतांना उमेदवारांनी अर्जात नमूद केलेले व सदर पदांसाठी आवश्यक असणारी सर्व विहित मूळ कागदपत्रे यांची छाननी करुन अंतीम निवड यादी व अंतीम प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येईल. जे उमेदवार कागदपत्र छाननीच्या वेळी मूळ कागदपत्र दर्शविण्यास असमर्थ ठरतील, असे उमेदवार अंतीम निवडीस पात्र राहणार नाहीत, असे नमूद आहे. त्यानुसार तात्पुरत्या अंतरीम निवड यादीमधील निवड झालेले उमेदवार श्री.यश सुदेश आगरकर व तात्पुरत्या अंतरीम प्रतिक्षा यादीतील अ.क्र.१ वरील उमेदवार श्री.कुलदीप बळीराम निकम हे दोन्ही उमेदवार कागदपत्र तपासणीस गैरहजर असल्यामुळे गुणवत्ता यादीतील गुणानुक्रमे पात्र असलेल्या उमेदवारांचा निवड यादीत समावेश करण्यात येत आहे.

जिल्हा परिषद वाशिमने प्रसिध्द केलेल्या जाहीरातीमधील मुद्दा क्र.१७.१६ नुसार गुणवत्ता यादीतील गुणानुक्रमे पात्र असलेले उमेदवार रोहन गणेशराव पवार यांचा अ.क्र.१ वर व श्री. गणेश साहेबराव पवार यांचा अ.क्र.२ वर अंतीम प्रतिक्षा यादीमध्ये **कागदपत्र पडताळणीचे अधिन** राहून समावेश करण्यात येत आहे.

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक ०४ मे २०२२ मधील मुद्दा क्र.११ ब) नुसार निवड करण्यात आलेला उमेदवार विहीत मुदतीत रुजू न झाल्यास अंतीम प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांमधून त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करुन कागदपत्र योग्य असल्यास पात्र उमेदवारांमधून सदरील रिक्त पद भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक ०४ मे २०२२ मधील मुद्दा क्र.११ अ) नुसार निवड समीतीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करतांना ज्या दिनांकापर्यंत रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत,यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय राहील, त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल, याची नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| सदस्य सचिव<br>जिल्हा निवड समिती तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)<br>जिल्हा परिषद, वाशिम | सदस्य<br>जिल्हा निवड समिती तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद, वाशिम | अध्यक्ष<br>जिल्हा निवड समिती तथा<br>जिल्हाधिकारी,<br>वाशिम |

Scanned with OKEN Scanner